प्रेस नोट

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतीबंधक विभाग बुलडाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. नरहरी विश्वनाथ टिकार, वय ५४ वर्ष, व्यवसाय नोकरी (मुख्याध्यापक) जिल्हा परीषद उच्य मराठी प्राथमिक शाळा, ग्राम आवार, रा. अभय नगर, घाटपुरी नाका, खामगांव |
| लाच मागणी | २०००/— रुपये |
| लाच स्विकारले | २०००/— रुपये |
| घटनास्थळ | जिल्हा परीषद उच्य मराठी प्राथमीक शाळा ग्राम आवार येथील मुख्याध्यापक यांचे कार्यालय |
| घटना तारीख | २५.०७.२०२२ |

थोडक्यात हकीकत :— यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली की त्यांचे व इतर शिक्षकांविरुध्द असलेल्या घरभाडयाच्या माहीती अधिकाराचे अर्जात सत्य माहीती सादर न करण्यासाठी लोकसेवक श्री नरहरी टिकार, मुख्याध्यापक, जिल्हा परीषद उच्य मराठी प्राथमीक शाळा आवार हे २०००/— रुपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत दिनांक २२.०७.२०२२ रोजी लेखी तक्रार दिली. त्यानुसार दिनांक २२.०७.२०२२ रोजी लाचमागणी पडताळणी कार्यवाही आयोजीत केली असता लोकसेवक टिकार यांनी तक्रारदार यांना त्यांचे विरुध्द माहीती अधिकाराचे अर्जात अर्जदार यांना सत्य माहीती सादर न करण्यासाठी २,०००/— रुपये लाचेची मागणी करुन आज दिनांक २५.०७.२०२२ रोजी सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे. श्री. नरहरी विश्वनाथ टिकार, यांनी तक्रारदार यांचेकडून २०००/— रुपये लाच स्विकारताना पंच क्र. १ यांचे समक्ष रंगेहात पकडले आहे

तरी यातील आलोसे. श्री श्री. नरहरी विश्वनाथ टिकार, वय ५४ वर्ष, व्यवसाय नोकरी (मुख्याध्यापक) जिल्हा परीषद उच्य मराठी प्राथमिक शाळा, ग्राम आवार, रा. अभय नगर, घाटपुरी नाका, खामगांव यांनी लोकसेवक पदाचा गैरवापर करुन, २०००/— रुपये लाचेची रक्कम तक्रारदार यांचेकडून स्विकारुन लोकसेवक पदाला न शोभणारे गैरवर्तन केल्याने आलोसे यांचे विरुध्द पोस्टे खामगांव ग्रामीण येथे अप.नं. २६०/२०२२ कलम ७ लाच लुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कार्यवाही :— १. मा. श्री. विशाल गायकवाड, पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती
२. मा. श्री. अरुण सावंत, अप्पर पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती
३. मा. श्री. देविदास घेवारे, अप्पर पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्री. संजय चौधरी, पोलीस उपअधिक्षक ॲन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा व सापळा पथक पोहेकॉ. विलास साखरे, नापोकॉ. विनोद लोखंडे, मपोकॉ. स्वाती वाणी, तसेच चालक नापोकॉ. नितीन शेटे यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा कार्यालय दुरध्वनी क्रमांक. ०७२६२—२४२५४८ व ८८८८७६८२१८ तसेच टोल फ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक ॲन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा यांनी केले आहे

( संजय चौधरी )
पोलीस उपअधिक्षक
ॲन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा